प्रति श्री सेक्रेटरी जनरल,

राज्यसभा,

संसद भवन,

नवी दिल्ली- 110001

माननीय साहेब,

विदेश मंत्री श्री सलमान खुर्शीद हे घटनेत सुधारणा करुन भारताचा काही प्रदेश हस्तगत करुन बांग्लादेशला ट्रांसफर करण्यासाठी बिल आणण्याचे बोलत आहेत. ते बिल घटनेचे कलम 119(एकशे एकोणीस) सुधारणा बील, 2013 म्हणून ते समजण्यात येत आहे. मी ते बिल आणण्यास विरोध व्यक्त केला आहे. सूचित बिलाचा विरोध हा त्याच्या वैधानिक योग्यतेवर आधारित आहे, कारण भारतीय संसदेला भारताचा प्रदेश बदलण्यासाठी घटनेत सुधारणा करण्याचा अधिकार घटनेचे कलम 368 नुसार मर्यादीत आहे. ते कलम सांगते की, घटनेच्या मूलभूत रुपरेषेत फेरफार करु शकत नाही. वर्ष 1973 नंतर घटनेची मूलभूत संरचना सिद्धांताप्रमाणे सादर करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे की, भारताच्या प्रदेशातील रुपरेषेत फेरफार करण्यासाठी घटनेत सुधारणा करून ते कमी करणे किंवा ते बदलू शकत नाही.

हे बिल सादर होईल तेव्हा त्यास विरोध करण्यासाठी मला परवानगी मिळावी यासाठी मी विनंती करित आहे.

आपले नम्र

(अरुण जेटली)